प्रकरण सहावे

# समारोप

*प्रकरण सहावे*

# समारोप

प्रस्तुत प्रबंधिकेत सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. 'बारोमास' ही कादंबरी आजपर्यंच्या ग्रामीण कादंबरीच्या प्रवासातली अलिकडच्या काळातली कादंबरी असून, ग्रामीण जीवन जगणाऱ्या लोकांचे संघर्ष चित्रित करणारी, ग्रामीण साहित्यातील प्रभावी व महत्त्वपूर्ण कादंबरी ठरते. या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करून तिच्यातील विविधता अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

'बारोमास' या कादंबरीचा अभ्यास करताना, कादंबरीतील विविध विषयांचा सखोल अभ्यास करता यावा म्हणून, एकूणच या अभ्यासाचे सहा प्रकरणात विभाजन केले आहे. ते पुढीलप्रमाणे...

प्रकरण पहिले - सदानंद देशमुखपूर्व मराठी ग्रामीण कादंबरी

प्रकरण दुसरे - 'बारोमास' मधील समाजचित्रण

प्रकरण तिसरे - 'बारोमास' मधील व्यक्तिरेखा

प्रकरण चौथे - 'बारोमास'ची संरचना

प्रकरण पाचवे - 'बारोमास' मधील भाषाशैली

प्रकरण सहावे - समारोप

पहिल्या प्रकरणात बारोमासपूर्व मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास केला आहे. तरी प्रथम कादंबरीच्या व्याख्येविषयी विवेचन करून, नंतर कादंबरीच्या पूर्वपीठिकेचा आढावा घेतला आहे. सर्वसाधारणपणे 'यात्रिकक्रमण' पासून मराठी कादंबरीची सुरुवात होत असली तरी, 'यात्रिकक्रमण' ही कादंबरी भाषांतरित स्वरूपाची असल्याने 'यमुनापर्यटन' हीच मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी

ठरते. मराठी कादंबरी 'यमुनापर्यटन' पासून पुढील काळात विकास पावत गेलेली दिसते. आणि इ. स. १९२५ नंतर मात्र कादंबरीच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. म्हणून कादंबरीचा विविध अंगानी अभ्यास केला आहे.

कादंबरीची विविध भाषेतील व्याख्या स्पष्ट करून तिचे स्वरूप पाहिले आहे. त्याच बरोबर कादंबरीचे प्रयोजन आणि रचनातंत्र यांचाही आढावा घेतला असून व्यक्ती, वातावरण, निवेदन, काल, प्रधान व्यक्तिरेखा या घटकांचाही अभ्यास केला आहे. मराठी कादंबरीची पूर्वपीठिका अभ्यासत असतानाच बारोमासपूर्व मराठी ग्रामीण कादंबरीचा आढावा घेऊन मराठी ग्रामीण कादंबरीचा प्रवास पाहिला आहे. तसेच ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना जो महत्त्वाचा टप्पा दिसतो. तो म्हणजे 'बळी', 'बनगवारवाडी' आणि 'धग' यांचे ही थोडक्यात विवेचन करून, इ. स. १९८० नंतरच्या काही महत्त्वाच्या ग्रामीण कादंबऱ्यांचा आढावा घेतला आहे.

दुसऱ्या प्रकरणात 'बारोमास' या कादंबरीत चित्रित झालेल्या समाजाचे चित्रण अभ्यासले आहे. कादंबरीतील समाजचित्रणाचा अभ्यास करीत असताना काही मुद्यांचे उपयोजन केले आहे. आणि त्या अनुषंगाने कादंबरीतील समाजचित्रण स्पष्ट केले आहे. तरी पुढीलप्रमाणे मुद्दे आहेत.

१. ग्रामीण जीवनातील अपुऱ्या सुख-सुविधा

२. नवशिक्षित झालेला ग्रामीण युवक.

३. ग्रामीण व शहरी जीवन यांची तुलना.

४. शहरातील सुख-सुविधांचे असणारे प्रचंड आकर्षण

५. शहरी जीवनाच्या आकर्षणातून ग्रामीण युवकाला येणारे अपयश.

६. शहरी मुलींची मानसिकता.

७. ग्रामीण तरुणांची तयार झालेली मानसिकता.

८. कादंबरीतील शेतकरी व त्यांची उत्पादने.

९. लेखकांचे ग्रामीण जीवनाशी असणारे संबंध.

या मुद्यांच्या आधारे लेखकाने विदर्भातील सामाजिक जीवन कसे आहे तेथील लोकांना जीवन जगत असताना संघर्ष कसा करावा लागतो. बेकारी कशी वाढली आहे आणि या बेकारीतूनच निर्माण झालेली सोनेरी टोळी आणि या टोळीने गुप्तधन शोधण्याचा केलेला प्रयत्न याचे चित्रण करताना विदर्भातील प्रदेशाला लेखकाने महत्त्व दिलेले आहे. आणि त्या भागातीलच समाजचित्रण कादंबरीत आणले आहे. देशमुख हे धगधगत्या ग्रामीण समाजाचे भेदक चित्रण करणारे असल्याने त्यानी अतिशय निर्भिडपणे लेखन करून समाजदर्शन घडविले आहे.

समाजदर्शन घडवित असताना, ग्रामीण भागातील काही उपेक्षित गोष्टींना प्राधान्य देऊन प्रकाशात आणण्याचा एक यशस्वी प्रयत्न केला आहे. म्हणूनच ग्रामीण पातळीवर जीवन जगणाऱ्या अनेक व्यक्तिरेखा इथे कादंबरीत योग्य पद्धतीने चित्रित करून, त्यांच्या समस्या प्रकाशात आणण्याचा व समाजातील कटू सत्य चित्रित करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. ते आपण समाजचित्रणाच्या सहाय्याने अभ्यासले आहे.

तिसऱ्या प्रकरणात, महत्त्वाच्या व्यक्तिरेखांचा विचार केलेला आहे. 'बारोमास' कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना आपणास असे दिसून येते की कादंबरीतील व्यक्तिरेखा चित्रित करताना, लेखक विदर्भातील परिसर व कादंबरीतील व्यक्तिरेखा यांच्याशी एकरूप होतात, म्हणूनच कादंबरीचे कथानक सहज घडत जाते. आणि वेगवेगळ्या वैचित्र्याने नटलेल्या मानवी स्वभावाचे कितीतरी नमुने येऊन जातात. त्या त्या समूहानेच 'बारोमास' ही कादंबरी निर्माण झाली आहे. या अनेक व्यक्तिरेखांचे कादंबरीतील चित्रण म्हणजेच, विदर्भाचे जीवनदर्शन घडते. या कादंबरीतील कथानक पाहिल्यानंतर असे दिसते की कोणत्याही एका विशिष्ट व्यक्तिरेखेवर ही

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कादंबरी लक्ष केंद्रित करत नाही. तर या कादंबरीत छोटे छोटे अनेक प्रसंगही चित्रित होताना दिसतात. त्यातूनच या कादंबरीचे कथानक आकाराला येते. म्हणून त्यात सलगतेच्या ऐवजी तुटकपणाच अधिक जाणवतो. तरीही कादंबरीतील व्यक्तिरेखा व्यवस्थित मांडण्यात लेखक कमी पडलेला नाही.

'बारोमास' मधील महत्त्वाच्या व्यक्तिरेखांचा विचार करताना, आपणास प्रथम एकनाथचा विचार करावा लागतो. पारंपरिक पद्धतीने प्रत्येक कलाकृतीत जो नायक असतो तो नायक इथे एकनाथच्या रूपाने चित्रित झाला आहे. पण तो अपयशी ठरला आहे. तो शिक्षण घेण्यासाठी शहरात येतो. शिक्षण पूर्ण करतो आणि आईच्या विरोधाला डावलून तो शहरातीलच मुलीशी विवाह करतो. आणि तो तिथेच वाट चुकतो. कारण मुलगी शहरी वळणाची असल्याने ती ग्रामीण भागात रहायला तयार नसते. आणि शेवंतामायचा विरोध असतानाही एकनाथने अलकाशी विवाह केल्याने शेवंतामाय तिला कोणत्याच घरकामात सहकार्य करत नाही. म्हणून एकनाथला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. आणि अलकाही त्याला साथ देत नाही. ती माहेरी जाते तेव्हा तो शेतकरी संघटनेत सामील होतो व मोर्चा काढतो, त्यावेळेस त्याला अटक होते. अशी एकनाथची व्यक्तिरेखा आली आहे.

अलका ही शहरी भागातली असल्याने ग्रामीण भागात राहणे तिला अप्रिय वाटत असले, तरीही अपरिहार्य असते. म्हणून ती सुरुवातीचे काही दिवस एकनाथच्या घरी राहते. पण नंतर मात्र ती जास्त दिवस राहू शकत नाही. ती माहेरी निघून जाते. म्हणून ती व्यक्तिरेखा कादंबरीत पुरेशी परिपक्व वाटत नाही.

नानू आजा जुन्या पारंपरिक विचाराचा आहे. तर सुभानराव हे आधुनिक पद्धतीने जीवन जगणारे आहेत. त्यामुळे नानू आजा व सुभानराव ह्या दोन वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्तिरेखा आपणास दिसतात.

शेवंतामाय ही व्यक्तिरेखा संपूर्ण कादंबरीत चित्रित होताना दिसते. आणि ती महत्त्वाची व्यक्तिरेखा ठरते. तसेच या कादंबरीत मधु, सुरेश साठे, बनुबा महाराज, दिलीप पवार, दिनकर दाभाडे, ममता वारे, मुक्ता, जया, दगडू शेठ, कांबळे तलाठी, बळीराम आणि इतर काही व्यक्तिरेखा या विदर्भातील भू-प्रदेशात कशा समरस होतात. हे लेखकाने दाखविले आहे. आणि कादंबरीतील व्यक्तिरेखांना स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळे कथानक गतिमान होते. व कादंबरीला उंची मिळते आणि कादंबरीची कक्षा रुंदावते.

चौथ्या प्रकरणात 'बारोमास'ची संरचना अभ्यासली आहे. या कादंबरीची संरचना अभ्यासत असताना, आपणास कादंबरीतील अनेक चित्रणे येताना दिसतात. त्यांच्या सहाय्याने कादंबरीची पार्श्वभूमी पाहिली आहे. आणि कादंबरीतील मूल्यात्मकताही तपासली आहे. त्याचबरोबर कादंबरीचे मुख्य कथानक पाहिले आहे. शिवाय कादंबरीत आलेले विविध समाज चित्रणेही अभ्यासली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. शेतकऱ्यांच्या पिकांना मिळणारी किंमत

२. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे चित्रण

३. प्राणी, पशू-पक्षी यांची दुष्काळामुळे होणारी होरपळ

४. भौतिक सुखाच्या मागे लागलेली सोनेरी टोळी

५. शेतकरी संघटना व त्यांच्या मागण्या

६. राजकीय लोकांचे चित्रण

७. ममता वारे आणि एकनाथ यांचे चित्रण

८. शहरी संस्कृतीचा प्रभाव

९. रावसाहेब याची आत्महत्या.

१०. नानू आजाचा स्वभाव.

अशी काही समाजचित्रणे कादंबरीत आली आहेत. त्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

पाचव्या प्रकरणात कादंबरीची भाषाशैली अभ्यासली आहे. भाषाशैलीच्या बाबतीत आपणास असे म्हणता येईल की, सदानंद देशमुखांनी 'बारोमास' या कादंबरीचे लेखन करीत असताना, कोणत्याही प्रकारच्या कृत्रिम भाषाशैलीचे उपयोजन केलेले नाहीत. तर विदर्भातील बोलीभाषेचाच उपयोग करून घेतला आहे. त्यामुळे कादंबरी प्रभावी ठरताना दिसते. म्हणून त्यांची कादंबरी वाचत असताना भाषाशैली महत्त्वाची वाटते शिवाय देशमुख कादंबरीत अतिशय स्पष्ट आणि वास्तव लेखन करतात म्हणून 'बारोमास' ही कादंबरी लिहित असताना त्यांनी काही भाषाशैलीचे घटक कादंबरीत अवलंबले आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. मनाचा वेध घेणारी भाषाशैली

२. भाषाशैलीतील प्रवाहीपणा

३. संवाद निर्मिती

४. काव्यात्मकता

५. उपमांचा समर्पक वापर

६. वाक्यप्रचार, म्हणी यांचा वस्तुनिष्ठ उपयोग

७. अस्सल ग्रामीण शिव्यांचा समावेश

८. सदानंद देशमुख यांच्या लेखनाचे वेगळेपण

वरील सर्व घटक कादंबरीतील भाषाशैली समृद्ध करताना दिसतात. अशाप्रकारे 'बारोमास' या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करताना, देशमुखपूर्व मराठी ग्रामीण कादंबरीचा आढावा घेतला आहे. आणि 'बारोमास' या कादंबरीतील समाजचित्रण, व्यक्तिरेखा, कादंबरीची संरचना आणि कादंबरीतील भाषाशैली यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. तरी वरील घटक 'बारोमास' मध्ये सनर्पकपणे आल्याने, एक चांगली ग्रामीण कादंबरी निर्माण झाली आहे.